

NAVALAKHA
निर्मित
संवाद
एन्टरटेन्मेंट
प्रकाशीत
टारगट मुलं
लेखन/दिग्दर्शन
योगेश सोमण
छायाचित्रण
राजेश साळवी
संकलक
संतोष गोठोस्कर
कार्यकारी निर्माता
सुनील महाजन
निर्माता
निलेश नवलाखा





## कथासार

शालेय जीवनातील केलेल्या खोड्या, शिक्षकांची केलेली फजिती, पालकांना दिलेला (अथवा झालेला) त्रास, शेजारी पाजाऱ्यांच्या आपल्याबद्दलच्या तक्रारी, अशा अनंत खोड्या, कुरापती ह्यांनी भरलेल एक दांडगेपणाचे बालपण प्रत्येकाच्याच वाट्याला आलेले असते. बऱ्याच वेळेस अशाच दांडगेपणातच भविष्याचा मार्ग सापडतो अथवा दृष्टीपथास येतो. बालपणीच्या ह्या दांडगेपणाला कृष्णलिला का म्हणतात ह्याचा अंदाज घेतला तरी त्या दांडगेपणाचे महत्व कळते.

''मुलांचे पाय पाळण्यात दिसतच होते'' ह्या उक्तीचा वस्तुनिष्ठ पुरावा म्हणुनच बालपणातील, शालेय जीवनातील गोष्टींकडे खोड्यांकडे आपण दिशादर्शक म्हणुन पाहतो.

सोळा – सोळा तास विजेच्या भारनियमाने त्रस्त झालेल गाव मुलांच्या दांडगेपणाला त्रस्त पालक व भयभीत झालेले शिक्षक. ह्या पार्श्वभुमीवर गावातील विजेच्या भारनियमाला पर्यायी प्रकाशवाट सर्वांना दाखविणारी मुलं –

''दांडगी मुलं''

शिन्या, दीना, सदा, जग्या, बाब्या सर्व मुले हेडमास्तरांच्या खोलीत अंगठा धरुन उभी केली आणि वर्गातील मास्तरांचा श्वास भांड्यात पडला कारण त्यामुळे मास्तरांना वर्गात पुढचे धडे शांतपणे शिकवता येणार होते. खरेतर आपल्या ह्या टोळीवरचा आरोप गंभीर होता. आज मुलांनी वर्गातुन बाहेर पडण्यासाठी शाळेच्या मागे भुयारी मार्गच खणायला सुरवात केली. खरतर शिक्षक, पालक ह्यांना हा प्रकार नवीन होता.





पण हेडमास्तरांना मुलांच्या ह्या कृत्यामुळे पुढील चिंता ही मोठी अडचणच वाटू लागली, कारण कलेक्टर कडून आलेले पत्र, पुढील १५ दिवसानंतर शाळेला राष्ट्रप्रमुखांची भेट होती, आणि त्यात ही दांडगी मुलांची टोळी. ह्यांना आवर कसा घालणार ? ह्या चिंतेनेच  हेडमास्तरांनी सर्व शाळेची मिटींग बोलावली होती.          .

खरेतर राष्ट्रप्रमुख येण्याने गावातील विजेचा प्रश्न आता सुटेल ही भाबडी आशा गावकऱ्यांपासून ते पंचायत; सरपंचापर्यंतची होती. पण त्या कार्यक्रमात ह्या मुलांनी काही खोड्करपणा केला तर ? सर्वानुमते एकच निर्णय –राष्ट्रप्रमुख येईपर्यंत ह्या मुलांना शाळेत प्रवेश बंद. त्या दिवशीच्या कोणत्याही सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग नाही हा ठराव होतो.तो पालकांपर्यंत पोहचवला जातो.

दरवेळेस होणारी शिक्षा, आई–वडिलांचा मार, हे काही शिन्या, दीना, सदा, जम्या, बाब्यांना नवे नाही पण शाळेच्या दृष्टीने गावासाठी महत्वाचा असणाऱ्या कार्यक्रमातून आपल्याला सगळ्यांनाच वगळले ह्याची खंत, राग शिन्या, दीना, सदा, जम्या, बाब्या ला स्वस्थ बसू देई ना.

ह्या रागातून, अस्वस्थतेतून राष्ट्रप्रमुख भेटीच्या वेळेस ठरवून केलेला दांडगटपणा कसा गावाला फायदयाचा आणि शाळेला अभिमानाचा होतो व सर्व गावाने, शाळेने नापास म्हणून गृहित धरलेली मुलं राष्ट्रप्रमुखांच्या शाबासकीने कशी पास होतात आणि आई–वडिलांचा विश्वास कसा सार्थ ठरवितात हे ह्या मनोरंजनाच्या माध्यमातून दाखवणारा पालकांचा, शिक्षकांचा आणि मुलांचा दांडगा चित्रपट  ''दांडगी मुलं''          .

- योगेश सोमण







# दांडगी मुलं

लेखन/दिग्दर्शन : योगेश सोमण

| | | | |
|---|---|---|---|
| संगीत | : केदार दिवेकर | गीत | : वलय मुळगुंद |
| छायाचित्रण | : राजेश साळवी | संकलक | : संतोष गोठोस्कर |
| कला | : सचिन नेवारे | रंगभूषा | : महेश बराटे |
| वेशभूषा | : प्रियंका बोडस | ध्वनी आरेखन | : [illegible] |
| निर्मिती प्रमुख | : राहूल ओदक | कार्यकारी निर्माता | : सुनील महाजन |

निर्मिती आरेखन : चॉईस फिल्म ॲण्ड टेलीव्हिजन इन्स्टिट्युट, पुणे.
निर्माता : निलेश नवलाखा
निर्मिती : नवलाखा आर्टस्, मिडीया ॲंड एन्टरटेनमेंट




**NAVALAKHA**
ARTS MEDIA & ENTERTAINMENT

620, Pentagaon, Shahu College Road
Parvati, Pune - 9
Phone : +91 20 24230411
Mob: +91 97620 40000
nileshnavalakha@dandgimuley.com

**CHOICE FILM & TELEVISION INSTITUTE**

Behind McDonald's, Karve Road,
Kothrud, Pune 411 038 India
Phone : +91 20 2545 5355 Ext: 13
Mob: +91 93251 01629
cftipune@dandgimuley.com

संवाद एन्टरटेन्मेंट

7/3, Pratik Nagar, Paud Road
Kothrud, Pune 411 038 India
Mob: +91 93710 10432
samwad.pune@gmail.com


www.dandgimuley.com